दैनिक www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ६६ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.२९ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# पीक विमा कंपन्यांना चाबकाचे फटके दिले पाहिजेत

# पीक विमा कंपन्यांत सरकारचा वाटा किती हे सांगावे लागेल-विजय वडेट्टीवार



**मुंबई (प्रतिनिधी-)पीक विमा कंपन्यांना चाबकाचे फटके दिले पाहिजेत. काही शेतकरी आपले अवयव विकन्यासाठी मुंबईत येत आहेत. पीक विमा कंपन्यांवर सरकारचा वाटा किती आहे आणि सरकारला किती वाटा मिळतोय हे आता आम्हाला सांगावे लागेल,असा हल्लाबोल विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शिंदे सरकारवर केला आहे. राज्यात एकीकडे अवकाळी पावसाचा हाहाकार पाहायला मिळत असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तेलंगणामध्ये प्रचार करताना दिसत आहेत. यावरुनच राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.**

दरम्यान विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, सरकारच्या लोकांमध्ये इतकी मुजोरी येथे कुठून? सरकारला आता जनता विटली आहे. सरकारला बदलल्याशिवाय पर्याय नाही,अशी भावना आता सर्वसामान्य शेतकऱ्यांची झालेली आहे. हल्ली सरकारचे सर्वच अंदाज चुकत आहेत. अवकाळी पावसामुळे ७८ हजार ७७६ हेक्टरचे नुकसान झाले आहे. उत्तर महाराष्ट्रात द्राक्ष पिकाचे नुकसान झाले आहे.धान्य उत्पादक शेतकऱ्यांचेही प्रचंड नुकसान झाले असताना सरकार मात्र तेलंगणा दौऱ्यावर प्रचारामध्ये व्यस्त आहेत.विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने वेळीच उपाययोजना न केल्याने १ हजार मंडळ वंचित राहणार आहेत. सरकारकडून पंचनामेच झाले नाहीत तर मदत कधी देणार? शेतकऱ्यांकडे कोण बघणार, त्यांचा वाली कोण? असा सवाल करत वडेट्टीवारांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे. केंद्र सरकारची मदत मिळेल आम्ही ते लोकांना देऊ असे सांगत सरकारकडून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.सरकारने दुष्काळ जाहीर करताना केलेल्या गलथानपणामुळे राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. सरकारने पहिल्या टप्प्यात ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला. फक्त या ४० तालुक्यांनाच आर्थिक मदत मिळणार आहे. परंतु इतर तालुक्यातील शेतकऱ्यांना देखील मदत मिळाली पाहिजे. राज्यात सुरु असलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे उरले सुरलेले पिकही उध्वस्त केले आहे. शेतकऱ्यांना आधाराची अपेक्षा असताना सरकार आणि मंत्र्यांनी त्यांच्याकडे पाठ फिरवणे हे संतापजनक असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करून आगामी अधिवेशनात सरकारकडे नुसानभरपाईची मागणी करण्यासाठी, शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी हा दौरा करणार असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले आहे.

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी साखर कारखाना ठरणार वरदान-प्रफुल पटेल

### नॅचरल ग्रोवर्स साखर कारखाना गाळप हंगामाचे खासदार प्रफुल पटेल यांच्या शुभहस्ते शुभारंभ

**भंडारा | प्रतिनिधी**

परिस्थितीनुरूप हा कारखाना बंद पडला होता पण या वैनगंगा व चुलबंद नदीच्या खोऱ्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी व लोकोपयोगी कामांसाठी पुन्हा साखर कारखाना सुरु करण्यात आला आहे. निश्चितच लाखांदूर, पवनी, अर्जुनी मोर, साकोली, लाखनी, सडक अर्जुनी, देसाईगंज व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी वरदान ठरणार आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना अन्य पिकांच्या उत्पादनाचा पर्याय मिळावा व शेतीवर आधारित अन्य उदयोग यावेत याच उद्देशाने कारखाना सुरु करण्यास प्रयत्न असे प्रतिपादन पटेल यांनी केले.२८ नोव्हेंबर ला लाखांदूर जि. भंडारा येथील नॅचरल ग्रोवर्स साखर कारखान्याच्या पहिले गाळप हंगामाचे शुभारंभ, गव्हाण व मोळी पूजन कार्यक्रम खासदार प्रफुल पटेल यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. खा.पटेल पुढे म्हणाले की, कामांसाठी कोणतीही बोंबाबोंब न करता विकास कार्य करण्यावर विश्वास ठेवतो. शेतकरी व शेतमजुर व बेरोजगारांचे हितासाठी नेहमी प्रयत्न केले आहेत. सध्या साखर कारखान्याची क्षमता ८०० मेट्रिक




टन असून पुढे कारखान्याची क्षमता वाढविण्यात येणार आहे. या कारखान्यामुळे परिसरातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार असून प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष पणे शेतमजूर व बेरोजगार युवकांना रोजगार मिळणार आहे. या शुभारंभ प्रसंगी खा.प्रफुल पटेल यांच्या सोबत माजी आमदार राजेंद्र जैन, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, नाना पंचबुद्धे,गंगाधर परशुरामकर, बाबा गुजर, सुनील फुंडे, धनंजय दलाल, यशवंत गणवीर, विनोद ठाकरे, अविनाश ब्राह्मणकर, संजय गुजर, सत्यजित गुजर,विजय सावरबांधे, बालूभाऊ चुन्ने, लोकपाल गहाने, संजना वरखडे, निमाताई ठाकरे, कल्पना जाधव, डॉ अविनाश काशीवार,लोमेश वैद्य, हरीश तलमले, अड मोहन राऊत, धनु व्यास, नागेश पाटील, देविदास राऊत,दानेश साखरे, नरेंद्र चौधरी, बबन पिलारे, राकेश राऊत, उमेश राऊत, सचिन बरंय सहित मोठ्या संख्येने शेतकरी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते बेबस हिंदी चित्रपटाच्या पोस्टरचे विमोचन व ट्रेलर प्रदर्शित

### मूल शहरात चित्रित करण्यात आला चित्रपट




**मूल | प्रतिनिधी**

२७ नोव्हे. २०२३ रोज सोमवार ला चंद्रपूर येथे, महाराष्ट्र राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य तसेच मत्स्यपालन व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर व वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते बिग बजेट बेबस ह्या हिंदी चित्रपटाच्या पोस्टर चे विमोचन करून चित्रपटाचे ट्रेलर प्रदर्शित करण्यात आले. ह्या प्रसंगी चंदन सिंह चंदेल तसेच हरीश शर्मा व बेबस हिंदी चित्रपटाचे लेखक , निर्माता व दिग्दर्शक कृपाल लंजे व प्रभाकर भोयर भाजपा शहर अध्यक्ष, मूल संतोष वरपल्लिवारश्री. प्रफुल यलचलवार, निलेश जंपलवार, आशुतोष सादमवार, सचिन गेडाम, कुमुदिनी भोयर, विनोद बोलीवार,सौ.ममता गोंगले, नैना खोब्रागडे, सुनील कुकुडकर, रोशन जंपलवार,विशाल दारवांकर,आशिष मस्के,माही देशवाल,करिष्मा मेश्राम, भाष्कर पिंपळे, अनिरुद्ध सादमवार,रितेश चौधरी, अमोल गेडाम, शालिनी सुटे, अविनाश पाटील,मयूर राशेट्टीवार,संदीप जुलमे, व चित्रपटाची पूर्ण टीम उपस्थित होती. ह्या प्रसंगी नामदार सुधीर मुनगंटीवार यांनी सर्व प्रेक्षक तथा महाराष्ट्रातील सर्व चित्रपट प्रेमींना १२ जानेवारी २०२४ ला बेबस हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असून हा हृदयस्पर्शी चित्रपट बघावयास गर्दी करून चित्रपटाला घवघवीत यश द्यावे असे प्रेक्षकांना आव्हान केले . तसेच हा चित्रपट आापल्या मूल शहरातील लोकल परिसरात चित्रीत केला असून ह्या चित्रपटा मध्ये मूल व विदर्भातील निष्ठावंत कलाकारांनी भूमिका साकारली असल्यामुळे हे आपण सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे असे मत आपल्या भाषणातून व्यक्त केले. प्रेक्षकांनी सुद्धा मंत्री महोदयांच्या आव्हानांना होकार दर्शविला व चित्रपटाच्या ट्रेलर प्रदर्शनाला मोठ्या प्रमाणात साद दिली.

## शेषराव महाराज दारु व्यसन मुक्ती संघटनेची व्याप्ती वाढणार

### सुरेश चौधरी यांचा पुढाकार;मंदिराकरिता जागा दान करित जोपासली बांधिलकी

**गोंडपिपरी | प्रतिनिधी**

तालुक्यात दारु व्यसनमुक्ती संघटनेचे काम जोमात सुरु आहे.दारु सोडा-संसार जोडा या उक्तीला घेऊन लावलेले इवलेशे रोपटे आज वटवृक्ष झाले.हजारो नागरिक या संघटनेशी जुडली.२०१० पासून सुरु झालेल्या प्रवासात कित्येक संसार वटणीवर आल्याचे सकारात्मक चित्र समाजात बघायला मिळत आहे.यातच गोंडपिपरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सुरेश चौधरी यांनी त्यांचे बंधू,पं.स.गोंडपिपरीचे माजी सभापती श्रीधरराव चौधरी यांच्या स्मृति प्रित्यर्थ परमपूज्यनीय शेषराव महाराज संसार वाचवा सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेसाठी मंदिर बांधकामाकरिता नुकतीच जागा दान केली.यामूळे आता संघटनेचे कार्य अधिक भक्कम होणार आहे.परमपूज्य शेषराव महाराज दारू सोडा - संसार जोडा सेवाभावी संस्थेचे काम गोंडपिपरी तालुक्यात मोठ्या ओघात सुरू आहे.चंद्रपूर गडचिरोलीसह राज्याच्या विविध भागातून सोबतच तालुक्यालगत असलेल्या तेलंगणा राज्यातून देखील भाविक मोठ्या प्रमाणात गोंडपिपरीत येतात.शुक्रवारी या भाविकांचा सत्संग सोहळा नियमित चालतो.अश्यातच त्यांना मंदिर बांधकामा करिता हक्काची जागा असावी,ही गेल्या अनेक वर्षांपासून या भाविकांची इच्छा होती.यासाठी शहरातील



प्रतिष्ठित व्यक्तिमत्व म्हणून सुरेश चौधरी समोर आले.त्यांनी आपल्याकडे असलेली जागा दान देण्याचे बोलून दाखवले.आणि भाविक भक्तात एकच आनंद पसरला.नुकतेच त्यांनी जागा दान देण्याच्या संबंधातली सोपस्कार प्रक्रिया पार पाडली.या सत्कार्यात परिवारातील सर्वच सदस्यांचा सहभाग राहिला.विशेषता श्रीधरराव चौधरी यांच्या अमरावती येथिल ज्योती पुंडकर यांच्यासह ईतर तीनही मुलींने गोंडपिपरीत येत संस्थेच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.या जागेवर आता मंदिर उभे राहणार आहे.सामाजिक बांधिलकी लक्षात घेत सुरेश चौधरी यांनी पुढाकार घेऊन केलेल्या सत्कार्याचे सर्वत्र कौतूक होत आहे.या संस्थेचे मार्गदर्शक असलेले चौधरी स्वतः उपाध्यक्ष पदावर कार्यरत आहेत.तर अध्यक्ष म्हणून गणपती चौधरी अतीशय सक्षमपणे जबाबदारी हाताळत आहेत.आज संघटनेशी हजारो नागरिकांची नाड जुडली आहे.दारु व्यसनाने भरकटलेले अनेक संसार या माध्यमातून वटणीवर येत आहेत.मंदिरासाठी जागा दान दिल्याने चौधरी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नुकताच त्यांचा सत्कार करित आभार मानले.

## पुज्य गुरु नानक देव प्रकाश पर्व यांची ५५४ वी जयंती उत्सहात साजरी

**पुलगाव | प्रतिनिधी**

पुज्य गुरु नानक देव प्रकाश पर्व यांची ५५४ वी जयंती कार्तिक पौर्णिमेच्या शुभ दिवशी पुलगाव येथील दोन्ही गुरुद्वारा, पंजाबी संगत गुरुद्वारा साहिब आणि सिंधी कॅम्प गुरुद्वारा साहिब येथे मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली.हा उत्सव जगभरात पंजाबी बांधवांनी साजरा केला. , शीख, सिंधी बांधव कुठेही राहतात. तिथल्या गुरुद्वारामध्ये मोठ्या भक्तीभावाने हा सण साजरा केला जातो. सर्व बंधू-भगिनी गुरुद्वारामध्ये जाऊन अरदास पठण करतात, गुरुग्रंथ साहिबचे दर्शन घेतात आणि एकमेकांना प्रकाश पर्वाच्या शुभेच्छा देतात. पुलगाव येथून ,सिंधी कॅम्प येथील गुरुद्वारा आणि पंजाबी गुरुद्वारामध्ये सकाळपासूनच दर्शनार्थींची रिघ लागली होती..या प्रसंगी वर्धा जिल्ह्याचे खासदार रामदास तडस यांनी पुलगाव गाठून दोन्ही गुरुद्वारात नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले.किशोर खुराणा यांनी पंजाबी गुरुद्वारात शाल अर्पण करून खा. तडस यांचे स्वागत केले. सिंधी कॅम्प गुरुद्वारामध्ये संगत साहेब व मुखी सुदर्शन बजाज यांनी खा. तडस यांचे




स्वागत केले.याप्रसंगी राजन उर्फ दारा चौधरी, सुनील अरोरा, सुरेंद्र खुराणा, अनिल नागपाल, दीपक खुराना, नितीन बडगे, आकाश दुबे, विशाल धोपडे, राजू पनपलिया, मधुकर रेवतकर, सुरेश अरोरा, अ. आहुजा, अमित खुराना, प्रीतम अरोरा यावेळी उपस्थित होते.खासदार रामदास तडस यांनी समाजातील सर्व बंधू-भगिनींना व जिल्ह्यातील सर्व सिंधी, पंजाबी बांधवांना शुभेच्छा दिल्या.पुलगाव येथील दोन्ही गुरुद्वारांमध्ये दुपारी १२ वाजल्यापासून मोठ्या प्रमाणात लंगर प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा लाभ विविध सामाजिक संस्थांनी घेतला.रात्री भव्य शोभा यात्रा काढण्यात आली.समाज बांधवांसह पुलगाव येथील व्यापारी.प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने सेवेदार म्हणून सेवा करताना दिसत होती.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंजाबी समाजातील सर्व तरुण,पुरुष व महिला व सिंधी समाजाने सहकार्य केले.प्र सलग प्रकाश पर्वाच्या १५ दिवस आधी दररोज प्रभातफेरी काढण्यात आली.सर्व कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्माचा लाभ घेतला.

सह्याद्रीचा राखणदार



## संपादकीय

# समूह विद्यापीठे आणि गुणवत्ता विकास

समूह विद्यापीठाबाबतचे धोरण जाहीर करून राज्य सरकारने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. येणाऱ्या परिस्थितीला यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी ही उत्तम संधी आहे. विद्यापीठामुळे आमच्या कल्पना राबविता येत नाहीत अशी तक्रार नेहमीच केली जाते. या पार्श्वभूमीवर आपली क्षमता आजमविण्याची ही चांगली संधी आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्र सरकारने सुरू केली आहे. पहिल्या टप्प्यात हे धोरण विद्यापीठातील विभाग आणि स्वायत्त महाविद्यालयांत लागू करण्यात आले. त्याचबरोबर खासगी विद्यापीठांच्या स्थापनेला चालना देण्यात आली.आता समूह विद्यापीठाबाबतचे धोरण जाहीर करून सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे. राष्ट्रीय धोरणात ज्या बाबींचा पुरस्कार केला आहे, त्यात बहुविद्याशाखीय शिक्षण, गुणवत्ता आणि शैक्षणिक नेतृत्व यांचा समावेश आहे.या तिन्ही घटकांच्या वाढीसाठी समूह विद्यापीठे महत्त्वाची कामगिरी बजावू शकतील. विशेषतः ग्रामीण भागातील संस्थांसाठी शैक्षणिक नेतृत्वविकासाची ही एक चांगली संधी आहे. समूह विद्यापीठाचा मुख्य आधार हा त्या संस्थेचे 'नॅक'चे ३.२५ सीजीपीए ( क्युमुलेटिव्ह ग्रेड पॉईंट व्हरेज-एकत्रित सरासरी श्रेयांक) असणारे, कमीतकमी दोन हजार विद्यार्थिसंख्या असणारे आणि वीस वर्षे कार्यरत असणारे महाविद्यालय असणार आहे.याशिवाय त्यात इतर कमीतकमी एक आणि जास्तीतजास्त चार महाविद्यालयांचा समावेश करता येईल. या सर्व महाविद्यालयांचे 'नॅक' मूल्यांकन आवश्यक आहे. याचाच अर्थ असा की समूह विद्यापीठात कमीतकमी दोन आणि जास्तीत जास्त पाच महाविद्यालये असतील.ही संख्या विशेष परवानगीने वाढू शकते. असे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी संस्थेची एका जिल्ह्यातील महाविद्यालये एकत्र येऊ शकतात. या सर्व महाविद्यालयांची मिळून असणारी विद्यार्थिसंख्या चार हजार इतकी हवी.सर्व महाविद्यालयाचे एकूण बांधकाम १५ हजार वर्गमीटर आणि त्याबाबत सरकारने घातलेल्या इतर अटी पूर्ण करराव्या लागतील. तसेच एकूण जमिनीचे क्षेत्रफळ हे मुंबईसाठी दोन हेक्टर, पुणे, नाशिक, नागपूर आणि संभाजीनगरसाठी चार हेक्टर आणि इतरत्र सहा हेक्टर एवढे असणे आवश्यक आहे.शैक्षणिक बाबतीत या महाविद्यालयांनी काही अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यात दोन संशोधनकेंद्रांसाठी प्रचलित विद्यापीठाची मान्यता, शोधनिबंध, प्रकल्पासाठी मिळालेले अर्थसाह्य, आंतरविद्याशाखीय गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम आणि अर्थसहाय्य उभे करण्याची क्षमता यांचा समावेश आहे. याशिवाय इतर दहा अटींची पूर्तता करावी लागणार आहे.त्या अटी डिजिटल सुविधा, स्थानिक भाषेत शिकवले जाणारे अभ्यासक्रम, उद्योगांशी सहकार्य, पीएचडी स्तरावरील अभ्यासक्रम, श्रेयांक पद्धतीचा अवलंब, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, राज्य आणि केंद्र सरकारच्या सूचनांचे पालन, प्रभावी व्यवस्थापन, आरक्षण आणि अपंगांसाठी सुविधा यांच्याशी संबंधित आहेत.या सर्व अटींशिवाय मान्यता मिळाल्यानंतर आणखी काही अटींची पूर्तता करावी लागेल. या समूह विद्यापीठांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविणे अनिवार्य असेल. यात सामील संस्थांमधील मूलभूत आणि इतर सुविधा एकत्रितपणे वापराव्या लागतील.शैक्षणिक पद्धती, परीक्षा आणि मूल्यमापनामध्ये बदल करावे लागतील. व्यवस्थापनात गतिमानता आणावी लागेल. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे आणि शिष्यवृत्ती यांची सोय करावी लागेल. शिक्षकांच्या कार्याचे मूल्यमापन आणि त्यांच्या योगदानावर आधारित बढती, पारितोषिके, कार्याची दखल आणि व्यवस्थापनात सहभाग याद्वारे प्रोत्साहन देणे आवश्यक असेल .ही मान्यता मिळविण्यासाठी विस्तृत प्रस्ताव तयार करणे आवश्यक असेल. यात हे विद्यापीठ कशा प्रकारे वाटचाल आणि प्रगती करणार आहे हे नमूद करावे लागेल. नवीन अभ्यासक्रम, मूलभूत सुविधांची निर्मिती, संशोधनाच्या दिशा, स्थानिक गरजा भागविण्यासाठी अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत आणि इतर सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठीचे प्रयत्न आदींचा अंतर्भाव या प्रस्तावात असणे आवश्यक आहे.या योजनेअंतर्गत राज्य सरकार प्रस्ताव मागवेल. संस्थांनी प्रस्ताव सादर केल्यानंतर तो सरकारने स्थापलेल्या समितीपुढे जाईल. समितीपुढे संस्थेच्या वतीने सादरीकरण करावे लागेल. त्यात चर्चा होऊन केलेल्या सूचनांप्रमाणे संस्थेला प्रस्तावात योग्य तो बदल करून पुनः सादर करावा लागेल. तो मान्य झाल्यानंतर संस्थेला प्रत्यक्ष भेट देऊन समिती पाहणी करेल. त्यानंतरच अंतिम मान्यता देण्यात येईल.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत अधिकाधिक महाविद्यालये स्वायत्त करण्याकडे सरकारचा कल आहे. प्रचलित विद्यापीठांवरील भार कमी करणे हा त्यामागचा हेतू आहे . त्याचबरोबर राज्य सरकार खासगी विद्यापीठांना परवानगी देत आहे.त्यासाठी अनेक संस्थांकडून प्रस्ताव येत आहेत. यात प्रमुख्याने व्यावसायिक महाविद्यालये चालविणाऱ्या संस्थांचा समावेश आहे. याचे कारण त्यांच्याकडे असणारे आर्थिक पाठबळ हे आहे. 'ग्रीन फील्ड' या प्रकारच्या नव्याने खासगी विद्यापीठासाठी सर्व सुविधा निर्माण कराव्या लागतात. शिवाय शिक्षकांचे वेतन आणि इतर खर्चाचा समावेश असतो.या संस्थांव्यतिरिक्त महाराष्ट्रात अनेक संस्था आहेत, ज्या अव्यावसायिक अभ्यासक्रम असणारी महाविद्यालये चालवतात. अशा संस्थांची स्वायत्त महाविद्यालये आहेत. असे असले तरी व्यवस्थापनाचे स्वातंत्र्य मर्यादित असते.त्यांना अधिक स्वातंत्र्य मिळण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरू शकते. यामुळे शैक्षणिक स्रोत एकत्रितपणे वापरता येतील आणि गुणवत्तावाढीस चालना मिळेल . शिवाय प्राचार्य आणि शिक्षकांचा व्यवस्थापनातील सहभाग वाढेल. व्यवस्थापन अधिक गतिमान आणि दूरदर्शी होण्यास चालना मिळेल.स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदारीची जाणीव होईल. नवीन कल्पना राबविण्यास वाव मिळेल. सरकारी सहाय्य काही प्रमाणात सुरू राहिल्याने स्वयंपूर्ण होण्यास अवधी मिळेल. स्थानिक व्यवस्थापन विकसित करण्याच्या धोरणाला चालना मिळेल .ग्रामीण भागातील संस्थांसाठी ही संधी उपयुक्त ठरू शकते .अर्थात काही गोष्टींची स्पष्टता होणे आवश्यक आहे. समूह विद्यापीठासाठी अर्ज करतांना भरावे लागणारे शुल्क आणि कायमस्वरूपी ठेवीची रक्कम खासगी विद्यापीठांसारखीच असणार आहे का ?ती तशीच असल्यास अव्यवसायिक महाविद्यालये चालविणाऱ्या संस्थांना ती भरणे शक्य होईल का? या दोन्ही रक्मा तुलनेने कमी असायला हव्यात.अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन ते निवृत्त होईपर्यंत सुरू राहील,असे समजते.बरेच शिक्षक पुढील काही वर्षातच निवृत्त होणार असतील तर संस्था अडचणीत येऊ शकते. त्यासाठी पुढील काही वर्षे नवीन नेमणूक केली नाही, तरी ठराविक अनुदान संस्थेला मिळण्याची हमी दिल्यास दिलासा मिळेल. कुलगुरू आणि इतर पदांच्या निर्मितीसाठी सरकार प्रतिवर्षी एक कोटी रुपये देणार आहे. ही बाब स्वागतार्ह आहे.मात्र हे सहाय्य पुरेसे आहे का, याचाही विचार व्हावा. या काही अडचणी असल्या तरी येणाऱ्या परिस्थितीला यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी ही उत्तम संधी आहे. विद्यापीठामुळे आमच्या कल्पना राबविता येत नाहीत अशी तक्रार नेहमीच केली जाते. या पार्श्वभूमीवर आपली क्षमता आजमविण्याची ही चांगली संधी आहे.

# दुहेरी भूमिकेचे राजकारण




महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एक 'बाहुबली' नेते म्हणून प्रसिद्ध असलेले छगन भुजबळ आक्रमक झाले आहेत. मराठा आरक्षणासाठी सुरू झालेल्या आंदोलनानंतर आता भुजबळ थेट मैदानात उतरले आहेत. राजकीय महत्त्वाकांक्षा असण्यात गैर काही नाही.आपली भूमिका घेऊन लोकांपर्यंत जाणे आणि जास्तीत जास्त जनाधार मिळविणे हेच संसदीय लोकशाहीत अपेक्षित असते. त्यामुळे भुजबळ कोणती भूमिका घेऊन उभे आहेत, याविषयी आक्षेप घेण्याचे कारण नाही.प्रश्न असा आहे की ते राज्याच्या मंत्रिमंडळाचे एक वरिष्ठ सदस्य आहेत. मंत्रिमंडळाच्या निर्णयांना सामूहिक जबाबदारीचे तत्त्व लागू असते. त्या निर्णयांना जाहीरपणे विरोध करणे हा औचित्यभंग ठरतो. त्यांनी घेतलेला पवित्रा आणि भाषणात मांडलेले मुद्दे पाहता अप्रत्यक्षरीत्या ते आपल्याच सरकारला आव्हान देत आहेत, असे चित्र निर्माण झाले आहे.एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मराठा समाजाच्या पाहणीसाठी नेमलेली माजी न्या. संदीप शिंदे यांच्या नेतृत्वाखालील समिती रद्द करण्याची भुजबळ यांनी रविवारी हिंगोली येथील जाहीर सभेत केलेली मागणी हेच अधोरेखित करत आहे.त्याचवेळी मराठा समाजाला देण्यात येत असलेली कुणबी प्रमाणपत्रे स्थगित करण्याचीही मागणी त्यांनी केली आहे. हे सारे सरकारने घेतलेल्या निर्णयांना आडवाटेने दिले गेलेले आव्हानच आहे. त्यामुळेच यामागे काही वेगळे राजकारण तर नाही ना, असा प्रश्न उभा राहिला आहे.सत्तेतही राहायचे आणि विरोधी भूमिका घेत तीही 'स्पेस' व्यापायची, असा हा प्रयत्न दिसतो. भुजबळ हे तीन दशकांपूर्वी शिवसेनेतील अग्रगण्य नेते होते. बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर घणाघाती वक्तृत्वासाठी आणि आक्रमक राजकारणासाठी त्यांचेच नाव घेतले जात होते.राज्यातील 'ओबीसी' समाजातून त्यांना पाठिंबा मिळाला. तो या समाजाने शिवसेनेला पाठबळ देऊन व्यक्तही केला. मात्र, पुढे मंडल आयोगास विरोध करण्याची भूमिका बाळासाहेब ठाकरे यांनी घेतल्यावर भुजबळ यांनी शिवसेनेला 'जय महाराष्ट्र!' केला आणि ते काँग्रेसप्रवेश करते झाले.त्यानंतर शरद पवार यांनी 'राष्ट्रवादी काँग्रेस'ची स्थापना केल्यापासून गेल्या काही महिन्यांपूर्वीपर्यंत ते पवारांची ठामपणे पाठराखण करत होते. मात्र, या काळातही त्यांनी 'समता परिषदे'ची स्थापना करून, स्वत:चे वेगळे अस्तित्व दाखवण्याचा केलेला प्रयत्न लपून राहिलेला नव्हता.या परिषदेच्या माध्यमातून त्यांनी देशभरात 'ओबीसीं'चा नेता अशी आपली प्रतिमा उभी करण्याचाही प्रयत्न करून बघितला होता. काँग्रेसमध्ये आणि पुढे 'राष्ट्रवादी'त गेल्यावरही आपले स्वतंत्र अस्तित्व आणि ताकद दाखवून देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. आताही तेच राजकारण ते पुढे नेत आहेत.नरेंद्र मोदी पंतप्रधान होण्याच्या बऱ्याच आधीपासून, म्हणजे १९८०च्या दशकातच ओबीसी समूह आपल्यासोबत घेण्याचे भारतीय जनता पक्षाने जोमाने प्रयत्न सुरू केले होते. आता भुजबळ हे एकनाथ शिंदे- देवेंद्र फडणवीस सरकारात अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सामील झाले असल्याने त्यांच्या या राजकीय खेळीकडे भाजप कशा रीतीने बघत आहे, ही कुतूहलाची बाब आहे.सत्ताधारी 'महायुती'स फायद्याचे ठरणारे हे डावपेच असले तरी ओबीसी नेतृत्व हे आपल्याऐवजी दुसऱ्या कोणत्या गटातील नेत्याकडे जाणे, भाजपला कितपत पसंत पडेल, याचा विचारही भुजबळ यांनी हा आक्रमक बाज अंगीकारण्याच्या आधी केला असणारच.भुजबळ हे कोणतीही खेळी विचारपूर्वक करण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. हिंगोलीतील सभेत रविवारी शिंदे समिती रद्द करण्याची मागणी करताना, ही समिती बेकायदा आहे, असा त्यांचा सूर होता. पुण्यात सोमवारी बोलताना मात्र त्यांनी यासंबंधात काहीसे मवाळ धोरण स्वीकारत, या समितीचे कार्य संपले असल्यामुळे ती रद्द करावी, असा पवित्रा घेतला.मात्र, कोणत्याही एका समाजाला मागास ठरवण्याबाबत विचार करताना, अन्य समाजाकडे दुर्लक्ष करता येणार नाही आणि त्यामुळेच जातीनिहाय जनगणना करायला हवी, असे त्यांनी आग्रहाने मांडले. तर्कतः त्यात काही चूक नाही. मात्र, त्यांच्या या मागणीमुळे अडचण होऊ शकते ती भाजपचीच.त्याचे कारण म्हणजे अशा प्रकारच्या जनगणनेस खुद्द पंतप्रधान मोदी यांनीच विरोध केला आहे. त्यामुळेच भुजबळ यांनी राजकारणाच्या सारीपाटावर टाकलेल्या या नव्या डावाचा सर्वच पक्षांना गांभीर्याने विचार करावा लागणार आहे.भुजबळ यांच्या आक्रमक वक्तव्यांना मनोज जरांगे-पाटील यांनी उत्तरे दिली. ही वाद-चर्चा फक्त मुद्याधारित राहिली तर हरकत नाही. पण तसे न होता त्यातून ज्या काही ठिणग्या उडताना दिसत आहेत, त्यातून तत्त्वबोध होण्याऐवजी समाजात तेढ निर्माण होण्याचे संकट समोर दिसते आहे.हे महाराष्ट्रासारख्या आजवर गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या राज्याच्या हिताचे नाही, हे संबंधित सर्वांनीच लक्षात घ्यायला हवे. आता अल्पावधीतच लोकसभा निवडणुकीचे वारे वेगाने वाहू लागेल. त्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारची कोणत्याही दोन समाजांत तेढ माजवणारी वक्तव्ये ही अधिकच हानिकारक ठरतील.भुजबळ यांनी याचा अधिक गांभीर्याने विचार करायला हवा; कारण ते राज्याचे मंत्री आहेत. राज्याचे हित हे वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि राजकारण यापेक्षा अधिक महत्त्वाचे असते. अजित पवार यांनी 'वादग्रस्त वक्तव्ये' टाळण्याचा पोक्त सल्ला कोणाचेही नाव न घेता दिला आहे. तो अमलात आणण्यातच राज्याचे हित आहे. दुहीचे राजकारण हे अंतिमत: विनाशाकडे घेऊन जाणारे कसे असते, हे इतिहासच सांगतो.शब्दांच्यद्वारे नव्हे तर दृष्टिकोन आणि कृती यांच्या माध्यमातून नेतृत्व साकारते.

# अठरा बगड जातीतील कलाल-कलार समाज; विश्वकर्मा योजनेअंतर्गत पारंपरिक(मद्य) व्यवसायचा खरा हक्कदार

रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

देशात जातीय व्यवस्था पुर्विपासुन होती आणि यांची अत्यंत सुरेख व सुंदर मांडणी होती.त्यानुसार प्रजेचा,गावगाड्याचा, राज्याचा व देशाचा कारभार सुरळीत चालत असे.त्यामुळे त्यावेळेस त्यागाची भावना होती.परंतु देश स्वतंत्र झाल्यानंतर राजकीय पुढाऱ्यांनी जातीयव्यवस्थेला मलीन करून विष घोळण्याचे काम केले व संपूर्ण समाजामध्ये कटुता निर्माण केली याला नाकारता येत नाही.स्वतंत्र पुर्वकाळात कलाल-कलार समाजातील प्रत्येक व्यक्तीने तळागाळातील लोकांपासून तर राजे महाराजे यांच्यापर्यंत सेवा दिली.त्यावेळ संपूर्ण अठरा बगड जातींना मावळे म्हणायचे.परंतु ज्यांना-ज्यांना जे काम दिले ते निःसंकोचपणे व चोख बजविण्याचे काम त्यावेळेस न सांगता संपूर्ण समाज करीत असे.आम्ही सर्वप्रथम अठरा बगड जातींचे मानकरी आहोत. त्यामुळे न्यायाच्या माध्यमातून विश्वकर्मा योजनेअंतर्गत कलाल -कलार समाजाला पारंपरिक(मद्य) व्यवसाय मिळायलाच पाहिजे.कारण हा समाजाचा हक्काचा व्यवसाय आहे;त्यामुळे यात समाजाला सरकार कडून योग्य न्याय मिळावा हिच अपेक्षा.मद्यविक्रीचा व्यवसाय हा कलार-कलाल समाजाचा हजारो वर्षांपूर्वीचा आहे.त्याचप्रमाणे शिवकाळापासुन मावळ्यांच्या रूपात चोख भुमिका बजावुन स्वराज्य स्थापन करण्यासाठी मोलाची भूमिका कलाल-कलार समाजाने बजावली यालाही नाकारता येत नाही.आता सध्या राज्यात जो आरक्षणाचा वाद सुरू आहे त्याला पुर्णपणे जबाबदार राज्याचे व देशाचे राजकीय पुढारी व लोकप्रतिनिधी आहेत.आपण पहात आहोत की राजकीय पुढारी आपली पोळी शेकण्यासाठी मराठा, धनगर, कलार-कलार व इतर समाजाच्या मागण्यांचे राजकारणात करीत आहेत ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.आज मराठा समाज, धनगर,कलाल-कलार, हलबा व अन्य समाज वाढती बेरोजगारी व आपल्या हक्काची लढाई लढत आहे व प्रत्येक अधिवेशनात मोर्चे काढून आपल्या हक्काचा टाहो फोडत आहेत.परंतु समाजाच्या मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करून तारीख पे तारीख असा लपंडाव करून संपूर्ण समाजबांधवांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम करीत आहे आणि ह्या संपूर्ण गोष्टी देश स्वतंत्र झाल्यानंतर होत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.त्यामुळेच आज प्रत्येक राजकीय पुढारी व पक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी सर्वसामान्यांचा बळी घेतांना दिसतो.जरांगे पाटील उपोषणाला बसले राजकीय पुढारी व सरकार फक्त बघ्याची भूमिका बजावत आहेत.परंतु जरांगे पाटील उपोषणाला का बसले याचाही सर्वंच राजकीय पुढाऱ्यांनी विचार करण्याची गरज आहे.आता राजकीय पक्ष व पुढाऱ्यांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की यापुढे प्रत्येक समाजात अनेक जरांगे पाटील तयार होतील यात दुमत नाही. कारण राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःचे हित साधण्यासाठी संपूर्ण जातीधर्मामध्ये व समाजामध्ये विष घोळण्याचे काम केले आहे. आज मराठा समाज जेव्हा आरक्षणाची मागणी करीत आहे तर सरकार निजाम काळीन पुरावे मागत आहे.ही हास्यास्पद बाब आहे.जरांगे पाटलांनी पुन्हा उपोषण सुरू केले तर सरकारमध्ये जनुकाय भुकंप आला की काय असे चित्र दिसुन आले व सरकारने तत्काळ कुणबी नोंदी शोधण्यासाठी मराठवाड्यात राबवलेली मोहीम संपूर्ण राज्यात राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३ नोव्हेंबर २०२३ रोज शुक्रवारला विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले व यासाठी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश सरकारने दिले.ह्या संपूर्ण घटना जरांगे पाटील यांच्या उपोषणामुळे सरकार धास्तावले.असाच रीतसर विचार राज्यातील संपूर्ण समाजाचा व्हायला हवा मग तो कोणताही समाज असो.महात्मा गांधींच्या आदेशानुसार स्वतंत्रपुर्व काळात समाजाने आपल्या पारंपरिक व्यवसायाचा बहिष्कार केला व संपूर्ण समाज स्वतंत्र लढ्यात तुटून पडला.परंतु गेल्या ७६ वर्षांपासून सरकार कलार-कलाल समाजावर अन्याय करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. सरकारला चांगल्याप्रकारे ग्यात आहे की कलाल-कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय मद्य विकने होता आणि आहे.परंतु हा व्यवसाय सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे ही बाब पुंजीपतींच्या लक्षात आली आणि राजकीय पुढाऱ्यांनी व पुंजीपतींनी स्वतःच्या स्वार्थासाठी कलार-कलाल समाजाचा विश्वासघात केला व बळी घेतला आणि कलाल-कलार समाजाला आपल्या पारंपरिक मद्य व्यवसायापासुन कोसोदुर नेवून लोटले.सरकारने हेही लक्षात ठेवले पाहिजे की कलाल-कलार समाजाचा दारूचा व्यवसाय देवादिकांपासुन सुरू आहे आणि याचा उल्लेख आपल्याला महादेवाच्या गाण्यांमध्ये दिसून येतो.परंतु कलाल-कलार समाजाला दाबुन ठेवण्यासाठी सरकारने केले आणि फक्त १ टक्के दारूचे परवाने समाजाला दिले व ९९ टक्के परवाने राजकीय पुढारी,पुंजीपती व आपल्या आप्तांना वाटुन समाजाचा खुला विश्वासघात केला.सरकारला कोणता समाज कीती व कोणत्या समाजाची कीती ताकद आहे हे जर पहायचे असेल तर सरकारने ताबडतोब जातिनिहाय जनगणना करने गरजेचे आहे.राज्यातील मराठा समाज असो वा अन्य समाज त्यांच्या हक्काच्या मागण्या सरकार डावलू शकत नाही. सरकारने कोणत्याही समाजाची मागणी पूर्ण करतांना इतरही समाजांचा गांभिर्याने विचार करायला हवा अन्यथा राज्यात दुफाळी माजेल.सरकारने कोणत्याही समाजाचा विचार करतांना कोणाच्याही दबावाखाली न येता व राजकारण न करता काम केले पाहिजे.आपण पहातो की राज्यातील कोणत्याही गोष्टीचा मार्ग काढण्यासाठी संपूर्ण पक्ष-विपक्षातील राजकीय पक्ष व पुढारी एकत्र येत नाही ही सर्वात मोठी खंत आहे.येणाऱ्या निवडणूका पहाता कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांनी फोल आश्वासने देऊ नये व समाजात दुफळी निर्माण करू नये.परंतू जो-जो समाज आपल्या हक्कांसाठी लढत आहे त्याचा हक्क त्याला देण्याचे प्रथम कर्तव्य सरकारचे आहे.त्यामुळे सरकारने गेल्या ७६ वर्षांपासून कलार-कलाल समाजाचा हिरावलेला हक्काचा पारंपरिक (मद्य) व्यवसाय कलाल-कलार समाजाला परत करायलाच पाहिजे.त्याचप्रमाणे इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळस्थापन करून समाजाच्या विकासाला चालना द्यावी.निवडणुका तोंडावर आल्या की सरकारकडून व राजकीय पक्षांकडून योजनांचा पाऊस पडतो.मग सरकार कलाल -कलार समाजाला पारंपरिक व्यवसाय व आर्थिक विकास महामंडळ का देत नाही? सरकारला आमचे म्हणने आहे की कलाल -कलार समाजाला भिक नकोच आमचा हक्क हवा. कलार-कलार समाजाची एकच मागणी आहे एकतर सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी लागू करावी अन्यथा ५० टक्के दारूचे परवाने कलाल-कलार समाजाला परत करावे किंवा नवीन परवाने उपलब्ध करून द्यावेत.कारण कलाल-कलार समाजाचा मद्य विक्री हा पारंपरिक व हक्काचा व्यवसाय आहे.आरक्षणाचा जेव्हा विचार केल्या जातो तेव्हा जातीला महत्व दिल्या जाते.मग आमचे वंशज लढले स्वराज्यासाठी रक्त सांडवले, त्याचप्रमाणे स्वतंत्रपुर्वकाळात देशासाठी लढले अशा परिस्थितीत जर सरकार समाजावर अन्याय करीत असेल तर कलाल -कलार समाज कदापी सहन करणार नाही. कलार-कलाल समाजाचा व्यवसाय आणखी कोणीही हिरावलेला नसुन स्वतः सरकारने हिरावला आहे हे आवर्जून सांगावे लागेल.त्यामुळे सरकारने संपूर्ण गोष्टींचा गांभीर्याने विचार करून कलाल -कलार समाजाला त्यांचा हक्क द्यावा हिच अपेक्षा! जय हिंद!

# ‘शिक्षणयात्रा’तून विदर्भात उच्चशिक्षणाचा जागर !

## देश–विदेशातील शैक्षणिक संधीचे मार्गदर्शन : शिक्षण विभाग व सामाजिक संस्थांचा पुढाकार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आदिवासीबहुल व मागास समजला जाणाऱ्या चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ जिल्ह्यासह विदर्भात देश–विदेशातील नामांकित विद्यापिठे, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती तसेच फेलोशीप याबाबत पुरेसी माहीती नाही. दहावी–बारावी, पदवी व पदव्युत्तर शिक्षण देश–विदेशातील नामांकित विद्यापीठात उच्चशिक्षणासाठी पुरेसे मार्गदर्शन मिळावे, या हेतूने चंद्रपूर जिल्ह्यातून विदर्भात उच्चशिक्षणाचा जागर करणारी शिक्षणयात्रा सुरु केली आहे.शिक्षण विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर, जागृत बहुद्देशीय संस्था व विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ब्रिटीश सरकारची जागतिक प्रतिष्ठेची चेव्हनिंग शिष्यवृत्ती प्राप्त तरुण वकिल, नुकतेच ब्रिटीश सरकारने चेव्हनिंग गोल्ड पुरस्काराने सन्मानित केलेले ड.दीपक चटप यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. या शिक्षणयात्रेची सुरुवात नुकतीच संविधान दिनी जिल्हा परिषद चंद्रपूर येथून मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनात प्राथमिक शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे, माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांच्या उपस्थितीतीत करण्यात आली. यावेळी समाजकल्याण अधिकारी सुरेश पेंदाम, महिला व बालविकास अधिकारी संग्राम शिंदे, उपशिक्षणाधिकारी विशाल देशमुख, जिल्हा परिषदेचे सर्व विभागप्रमुख, जिल्ह्यातील सर्व पंचायत




समीतीचे गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. या शिक्षण यात्रेचे समन्वयक म्हणून मुख्यमंत्री फेलो राहिलेले सामाजिक कार्यकर्ते अविनाश पोईनकर हे भूमिका पार पाडत आहे.लंडनमध्ये कायद्याचे उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर देश–विदेशात अनेक संधी दीपकला उपलब्ध झाल्या आहेत. या संधीतून वैयक्तिक आर्थिक संपन्नता येईल मात्र शिक्षणाचा उपयोग तळागाळातील घटकांना व्हावा म्हणून त्यांनी विधी, शिक्षण व धोरणनिर्मिती क्षेत्रात रचनात्मक काम करण्याचे ठरविले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी तयार करण्याचा संकल्प या यात्रेतून असल्याचे मत समन्वयक अविनाश पोईनकर यांनी व्यक्त केले. २६ नोव्हेंबर २०२३ संविधान दिन ते २६ जानेवारी २०२४ गणतंत्र दिन या दोन महिन्याच्या काळात चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळसह विदर्भातील १२ वी पुढील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात पोहोचून देश–विदेशात पदव्युत्तर शिक्षणातील संधी, शिष्यवृत्ती, फेलोशीप बाबतची माहिती आणि आव्हाने याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. 'शिक्षण यात्रा : एज्युकेशन टू इम्पावरमेंट' या कृतीयुक्त कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षणाबाबत देश विदेशात उपलब्ध शिष्यवृत्ती, कोर्सेस, प्रवेश प्रक्रिया, आवश्यक क्षमता व कौशल्ये आदींबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. या शिक्षणयात्रेतून येणाऱ्या काळात महाविद्यालयीन विद्यार्थी देश–विदेशातील नामांकित विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यासाठी सज्ज होतील व शैक्षणिक चळवळ तयार होईल, असे मत प्राथमिक शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे यांनी व्यक्त केले. सुमती फाऊंडेशन, जागृत संस्था यांचे विशेष सहकार्य या यात्रेला लाभले आहे.

**मी लंडन येथे कायद्याचे उच्चशिक्षण घेवून नुकताच भारतात परतलो आहे. विदर्भातील विद्यार्थी क्षमतावान आहे. मात्र माहितीचा अभाव, पुरेसे मार्गदर्शन न मिळणे, आर्थिक अडचणी आणि शिक्षणाबाबतची निरुत्साहता विद्यार्थ्यांत वाढताना दिसते. शिक्षण संधीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी हा कृतीयुक्त कार्यक्रम हाती घेणे मला महत्वाचे वाटले.**

**–ॲड.दीपक चटप**
**आंतरराष्ट्रीय चेव्हनिंग स्कॉलर, यु.के**

त्यासोबतच पाथ फाऊंडेशन, पॉलीलॉ नेटवर्क फाऊंडेशन, सत्यशोधक कलेक्टीव, संकल्प फाऊंडेशन, युवाशक्ती फाऊंडेशन या सामाजिक संस्थांच्या विशेष सहकार्याने शिक्षणयात्रेची सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे येणाऱ्या काळात उच्चशिक्षणाची चळवळ चंद्रपूर–गडचिरोलीसह विदर्भातील विद्यार्थी–युवकात निर्माण होईल अशी आशा निर्माण झाली आहे.

## बिरसा मुंडा यांचा आदर्श ठेऊन अन्याया विरुद्ध संघर्ष केला पाहिजे – डॉ.नामदेव किरसान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

२७ नोव्हेंबर २०२३ रोजी मौजा नावरगाव (रत्नापूर) ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर येथे आदिवासी समाज मंडळ नवरगावच्या वतीने क्रांतिवीर बिरसा मुंडा जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात आपल्या उदघाटकीय भाषणात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी महासचिव तथा गडचिरोली–चिमुर लोकसभा सामान्वयक डॉ. नामदेव किरसान यांनी बिरसा मुंडा यांनी केलेल्या संघर्षा बद्धल माहिती देऊन बिरसा मुंडा यांनी इंग्रजांचे हस्तक जमीनदार, मालगुजर व साहूकार यांनी त्यावेळी चालविलेल्या अत्याचारा विरुद्ध बंड पुकारले.बळजबरीने शेतसरा वसूल करने, आदिवासी शेतकऱ्यांना फुकट राबविणे , त्यांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असलेल्या जमिनी बळकावून त्यांना जंगलात पळवून लावणे इ. अत्याचार करीत होते. आपल्या जमिनीचे व अस्तिवाचे स्वरक्षण करण्यासाठी बिरसा मुंडा यांनी लोकांना संघटित करुन संघर्ष केला व अवघ्या वयाच्या २५ व्या वर्षी जीवाचे बलिदान



दिले. आजच्या परिस्थितीत होणाऱ्या अन्याया विरुद्ध सुद्धा आपण संघटित होऊन संघर्ष करायला पाहिजे. आपल्याला मिळणारे अधिकार कोणी हिरावून घेत असेल तर जागरूक राहून संघटित रूपाने त्याचा प्रतिकार करायला पाहिजे. असे त्यांनी आवर्जून सांगितले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आदिवासी विकास परिषदेचे केंदिय सदस्य जनार्दनजी पंधरे, माजी जि. प. सदस्य खोजरामजी मारस्कोल्हे, डॉ. श्रीकांत मसराम, अ. भा. आ. वि. प. जिल्हाध्यक्ष जनार्दन गेडाम, सरपंच राहुल बोडणे,अ. भा. आ. वि. प. प्रदेश महासचिव केशव तिराणिक, प्रा. परशुराम उईके, अ. भा. आ. वि. प. महिला जिल्हाध्यक्ष गीता सलामे, बाबुराव जुमनाके, पुष्पा सिडाम, संजय गहाणे, राहुल बोडणे, गीता सलामे, पंकज उईके, गणमान्य मंडळी व मोठ्या संख्येने आदिवासी बंधू भगिनी उपस्थित होते.

## सिरोंचा तालुक्यातील गर्रकापेठा येथील ग्रामीण व्हॉलीबॉल सामन्याचे माजी आ.दिपक आत्राम यांच्या हस्ते उदघाटन

**सिरोंचा । प्रतिनिधी**

तालुक्यातील गर्रकापेठा येथे बि.आर.एस व आविस कडून आयोजित ग्रामीण व्हॉलीबॉल सामन्याचे उदघाटन नुकतेच भारत राष्ट्र समितीचे नेते,आदिवासी विद्यार्थी संघाचे विभागीय अध्यक्ष व माजी आमदार दिपक आत्राम यांच्या हस्ते करण्यात आला.या उदघाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून आविस सिरकोंडा सरपंच लक्ष्मण गावडे तर प्रमुख पाहुणे म्हणून मादाराम सरपंच दिवाकर कोरेत, आविस जेष्ठ सल्लागार डॉ.बिचमय्या कुडमेथे,बामणी माजी उपसरपंच व्यंकटी कारसपल्ली,माजी सरपंच इरपा मडावी,जसवंत कोंडागुर्ले,आविस सल्लागार विजय रेपलवार, आविस सल्लागार वाईल तिरुपती, सतीश गावडे,प्रवीण इंदुरी, शंकर मडावी,प्रशांत गावडे,आत्राम मोडेम,व्यंकटस्वामी रामटेके,राजण्णा दुर्गम,इरशाद शेख, अंकुश दुर्गे,मिलिंद अलोने,जुलेख शेख,विनोद कावेरी,चंद्रमोगली माडेम, समीर कोटरंगी सह आविस व बीआरएस चे पदाधिकारी उपस्थित



होते.यावेळी माजी आमदार दिपक आत्राम यांनी उपस्थित खेळाडू व नागरिकांना व्हॉलीबॉल या मैदानी खेळाविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.ग्रामीण व्हॉलीबॉल या सामन्यासाठी प्रथम पुरस्कार माजी आमदार दिपकदादा आत्राम यांच्या कडून तर द्वितीय पुरस्कार माजी सरपंच विजय कुसनाके यांच्या कडून व तृतीय पुरस्कार सिरोंचा नगर पंचायत उपाध्यक्ष बबलू पाशा यांच्या कडून ठेवण्यात आले.गरकापेठा येथील बि.आर.एस.व आविस कडून आयोजित ग्रामीण व्हॉलीबॉल सामन्याचे यशस्वीतेसाठी रवींद्र रामटेकी,व्यंकटी गावडे,समय्या कोंडागुर्ला,संदीप आसम,समय्या आसम,संजू रामटेके,आकाश मोर्ला, रोहन दुर्गम,शेखर दुर्गम,यशवंत कोंडागुर्ला, सुहास कोंडागुर्ला, राजलींगु कुमरी,नागेश कुमरी,सुनील गावडे,सडवली गावडे,मनोज आत्राम,सुरेश तलांडी, रामू गावडे यांनी परिश्रम घेतले. उदघाटनीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आविस जेष्ठ सल्लागार डॉ. बिचमय्या कुडमेथे यांनी मानले.या उदघाटनीय सोहळ्याला गरकापेठा सह परिसरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## अवकाळी पावसामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

### शेतशिवारात धान पुंजण्याचे संरक्षण





**मूल । प्रतिनिधी**

सध्या धान कापणी, बांधणी व मळणीचे काम जोमात सुरु आहे अशातच, मागील तीन–चार दिवसांपासून ढगाळ वातावरण तयार झाले आहे. सोमवारी सकाळी पावसाचे काही थेंबही पडले त्यामुळे शेतशिवारात अवकाळी पावसामुळे धान पिकाचे पुंजणे ओले होऊन नुकसान होऊ नये यासाठी पुंजने अशा प्रकारे ताडपत्रीने झाकून ठेवले आहेत.अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने होत्याचं नव्हतं झालं आहे. जे पीक येणार होते ते देखील हिरावल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरवला आहे. मात्र ऐन काढणी सुरु असताना अवकाळी पावसाने तडाखा दिला. भाताचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली.' औदा लय मेहनत घेतली व्हती, पाणी कमी झाला तरी पाणी भरून पीक उभं केलं होतं, पण अवकाळी पावसाने सगळ्या मेहनतीवर पाणी फेरल,आज या भाताला चांगला भाव मिळणार व्हता, पण आता पावसात भिजल्याने त्याला निम्मा सुद्धा भाव मिळणार नाही,आता काय करायचं, असा सवाल उपस्थित करत पाण्यात निपचित पडलेल्या भाताच्या पेंढ्या गोळा करण्यात शेतकरी व्यस्त झाले आहे .मूल तालुक्यात एकमेव धानाचे उत्पन्न शेतकरी घेत असून सिंचन सुविधे अभावी केवळ घान हेच एकमेव उत्पन्न शेतकऱ्यांना घ्यावे लागत आहे. एका उत्पनाच्या भरोशावर तालुक्यातील शेतकरी बांधव अवलंबून आहेत असे असताना ऐन धान फसल कापणी करण्यात आली असून धानाची कापणी झाल्यानंतर धानाचा दाना पूर्ण वळवण्यासाठी आठ दिवसांचा कालावधी लागतो परंतु कापणी होऊन चार पाच दिवस झाले आहेत. तसेच अनेक

**अवकाळी पावसामुळे मूल तालुक्यातील धान उत्पादक आणि कापूस शेतकऱ्यांना मोठया नुकसानीला समोर जावे लागले. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तात्काळ नुकसानाचे सर्वे करून सरसकट धान,कापूस, तूर उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी – मंगेश पोटवर शेतकरी नेते तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुका अध्यक्ष मूल**

शेतकऱ्यांची कापणी अजूनही सुरु आहे. असे असतांना आकस्मित पाऊस आल्याने मूल, चिमडा, बोरचांदली, राजगड, फिस्कुटी, वीरई, खेडी, टेकाडी, गडीसूर्ला, जुनासुर्ला, नवेगाव(भू)बेंबाळ, नांदगाव, भेजगाव, हळदी, चिचाळा, ताडाळा, चिरोली, कांतापेट,भादुर्णा, राजोली, चिखली, डोंगरगाव, यांचेसह अनेक गावातील कापलेले धानाच्या सरड्या पूर्ण ओल्या झाल्या असून शेतकऱ्यांच्या हाती आलेले उत्पन्न पावसामुळे खराब झाल्याने असंख्य शेतकऱ्याचे फार मोठे नुकसान झाले आहे.तालुक्यातील काही शेतकरी मजुरांच्या हाताने धानाची कापणी केली तर काही शेतकऱ्यांनी खर्चाचा बजेट लक्षात घेता हार्वेस्टर मशीन लावून धान कापणी व चूरणी एकसात केली असून पाण्यात भिजल्याने अतोनात नुकसान झाली आहे.तालुक्यातील शेतकरी बांधव आकस्मित येत असलेल्या पावसामुळे एकही पोता धान घरी आणते की काय? असा प्रश्न अनेक शेतकरी बांधवांना पडला असून गेल्या दोन वर्षांपूर्वी अशीच परिस्तिथी आली.

## सावता परिषदेच्या वतीने महात्मा जोतीराव फुले यांना अभिवादन



**बीड । प्रतिनिधी**


क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त सावता परिषदेने बीड येथे अभिवादन केले.महात्मा जोतीराव फुले सामाजिक परिवर्तनाचे उद्गाते होते.परिवर्तानाची लढाईत क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांनी खांद्याला खांदा लावून साथ दिली.त्यामुळेच आज सामाजिक स्वातंत्र्याची फळे चाखायला मिळाली आहेत.

बीड शहरात सावता परिषदेच्या वतीने महात्मा जोतीराव फुले व सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ राजीव काळे,बीड जिल्हाध्यक्ष किशोर राऊत,जिल्हा महासचिव प्रा.रणजीत आखाडे,तालुका उपाध्यक्ष बाबुराव राऊत, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम जाधव,सावता नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव दूधाळ, संचालक मोहनराव गोरे,संतराम पानखडे, भगतसिंग राठोड, माळी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष लक्ष्मण गुंजाळ, पतसंस्थेचे व्यवस्थापक रमेश मदने,बाळासाहेब ढवळे, दिपांकर रोडे,प्रा.राम गायकवाड,पांचाळ,चंद्रशेखर खोड,जंगले साहेब,अनिल खांडे,अनिल देवळकर,बाळासाहेब काकडे आदिजण उपस्थित होते.

## अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांचे पंचनामे करण्याचे आदेश

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात दि. २६ ते २८ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत अवकाळी पावसामुळे शेतमालाचे / फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या कालावधीत अथवा यापुढे होणा–या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे / फळपिकांचे नुकसानीचे पंचनामे विहित कार्यपध्दतीनुसार करण्याचे निर्देश शासनाने दिले आहे. सदर निर्देशांच्या अनुषंगाने वस्तुनिष्ठ पंचनाम्यानंतर ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेतीपिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतक–यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरानुसार मदत देण्याबाबतचा निधी मागणी अहवाल विहित नमुन्यात संयुक्त स्वाक्षरीसह त्वरीत जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे सादर करावा, असे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी सर्व तहसीलदार, संवर्ग विकास अधिकारी आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांना दिले आहे.

## गाव सुसंस्कृत व सुशिक्षित व्हाव हीच राष्ट्रसंताची शिकवण–डॉ.आगलावे



**वरोरा–**प्रत्येक गाव हे सुसंस्कृत व सुशिक्षित व्हाव हीच राष्ट्रसंताची शिकवण असल्याचे प्रतिपादन श्री. गुरूदेव प्रचारक डॉ. अंकुश आगलावे यांनी शेंबळ येथे ५५ व्या पुण्यतिथी सोहळा प्रसंगी केले. या सोहळया प्रसंगी गावात सद्गुरू जगन्नाथ महाराज यांची पालखी व दिंडी काढण्यात आली. तसेच भजन, किर्तन व प्रवचन इत्यादी कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी गुरूदेव प्रचारक शेंबळ यांनी डॉ. आगलावे यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार केला.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ. आगलावे म्हणाले की राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी अंधश्रध्दा, देवभोळेपणा दूर व्हावा यासाठी जनजागृती केली तसेच सामुदायिक प्रार्थना म्हणून त्यांनी लोकांना एकत्र करून गावाचे व शेतकऱ्यांचे महत्व पटवून दिले. ५५ पुण्यतिथी सोहळया प्रसंगी, मोठया संख्येने शेंबळ येथील श्री. गुरूदेव प्रचारक, ग्रामवासी व नागरिक उपस्थित होते.

## ठाणेदार पवार ‘पॉवर फुल्ल’

## अवैध व्यवसायिकांची बत्ती गुल्ल

**आष्टी । प्रतिनिधी**

सहा महिन्यापूर्वी आष्टी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या परिसरात अवैध दारू व्यवसाय व जुगार अड्ड्यानी घुमाकूळ घातला होता. मात्र अलीकडच्या काळात जुगार अड्डे हद्दपार झाले असून अवैध दारू विक्रीही दहशतीत सापडली आहे. कर्मचारी संख्या कमी असतानाही ठाणेदाराच्या चोख प्रशासनाद्वारे येथील कायदा व सुव्यवस्था नियंत्रणात आल्याचा प्रत्येय येथील नागरिक घेत आहे.मागील वर्षी आष्टी शहरासह तालुक्यात जुगार अड्ड्यांना ऊत आला होता परंतु यावर्षी सहा महिन्यापूर्वी येथील पोलीस स्टेशनमध्ये रुजू झालेल्या ठाणेदाराने आपल्या कुशल चोख प्रशासनाद्वारे शहरासह आष्टी तालुक्यातील जुगार अड्डे हद्दपार केल्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्तहोण्यापासून बचावले आहे. अधिकारी कोणीही असो, त्या अधिकाऱ्याने आपल्या अधिकाराची काटेकोर अंमलबजावणी केली तर जनता,जनार्दनाच्या पदरात न्याय पडतो एवढे मात्र खरे. ठाणेदार सुनील सिंग पवार यांनी आपल्या सहकार्याच्या मदतीने कडे कोट यंत्रणा राबविल्यामुळे तथा शिस्तबद्ध प्रशासनामुळे जुगार अड्डे चालक, जुगार खेळणारे तथा या धंद्यात कमिशन एजंट असणारे पुरते धास्तावले असल्यामुळे



या सर्वांनी जुगार अड्ड्यातून काढता पाय घेतला असे एकूण चित्र आहे. त्यामुळे शहराच्या प्रमुख ठिकाणासह गल्लीबोळात सुरू असलेले तसेच ग्रामीण भागात राजरोसपणे सुरू असलेले सोबतच द्रुववडा व परसोड परिसरात नावाजलेले हे जुगार अड्डे ठाणेदार सुनील सिंग पवार यांच्या नियोजनामुळे तूर्त हद्दपार झाले आहे. यापुढे शहरासत ग्रामीण भागातील दारूच अवैध धंदे सुद्धा मोडकळीस आणण्यास आपण प्रयत्नशील असल्याचे ठाणेदार पवार यांनी सुतोवाच केले. ठाणेदाराच्या धाकापाई दारू व्यावसायिक सुद्धा दास्तावलेले असल्याचे निदर्शनास येत आहे. पोलीस स्टेशनमध्ये असलेले अपुरे संख्याबळ त्यामुळे या ठाण्यावर तालुक्याचा कायदा व सुव्यवस्थेतचा तान जरी येत असला तर आम्ही आमच्या कर्तव्यात कसूर होऊ देणार नाही व तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कटिबद्ध राहू असे ठाणेदार सुनील सिंग पवार यांनी सांगितले.

# ‘गणपती बाप्पा मोरया’ या जयघोषात जात-पात विरहित समाजाचे वर्णन - ना.सुधीर मुनगंटीवार

## मुंबई येथील कलावंतांचा संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

**चंद्रपूर I प्रतिनिधी**

‘गणपती बाप्पा मोरया’ असा जयघोष केल्यानंतर आपल्यामध्ये ऊर्जा संचारते. पण हा जयघोष केवळ एका सणापुरता मर्यादित नसून त्यामध्ये जात-पात-धर्म विरहित समाजाचे वर्णन आपल्याला बघायला मिळते. लोकमान्य टिळकांनी ज्या भावनेतून घरातील गणेशपुजा सार्वजनिक स्वरुपात सुरू केली, त्या राष्ट्रभक्तीच्या भावनेनेही जात-पात-धर्माची बंधने मोडून काढली होती. आपणही याच भावनेतून हा उत्सव दरवर्षी साजरा करावा आणि याचे स्वरुप अधिक मोठे करावे, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याच पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.चंद्रपूर जिल्ह्यासाठी आयोजित गणेशोत्सव स्पर्धेचा पुरस्कार वितरण व संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रम सोहळा क्लब ग्राऊंड येथे आयोजित करण्यात आला. त्यावेळी ना. मुनगंटीवार बोलत होते. या कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, गुरूदेव सेवा मंडळाचे लक्ष्मणराव गमे, ब्रिजभूषण पाझारे, सुभाष कासनगोट्टुवार, काशी सिंग, समीर केने, प्रविण मोहुर्ले, नंदू रणदिवे, किशोर कापगते, प्रभाकर भोयर, चंदू आष्टनकर, चंदू मारगोनवार, सूरज पेदुलवार, प्रज्वलंत कडू आदी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुरस्कार विजेत्या गणेश मंडळांचे त्यांनी अभिनंदन केले. याशिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजन स्पर्धेतील विजेत्यांचेही त्यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमात ‘बेबस’ चित्रपटाच्या जाहिरात फलकाचे अनावरणही ना.मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. गणराज रंगी नाचतो’ या मुंबई येथील ५० कलावंतांच्या भव्य संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.ना. मुनगंटीवार म्हणाले, ‘सांस्कृतिक कार्यमंत्री म्हणून



गेल्यावर्षी मी पहिल्यांदा गणेश उत्सवाची राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित केली. यावर्षीही या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. चंद्रपूर, मुल, बल्लारपूर इथे भाजपच्या वतीने हे आयोजन करण्याचे आवाहन केले होते. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. गणेशोत्सव हा आनंदाचा सण आहे. या सणाला प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अनमोल भाव बघायला मिळतात. एक सूर, एक गीत प्रत्येकाच्या ओठांवर असते. त्यावेळी जात-पात-धर्म बघितला जात नाही. चंद्रपूरमध्ये याच भावनेतून हा उत्सव साजरा होत असतो. इथे गणेशोत्सव साजरा होतो तेव्हा सगळ्या धर्मांचे लोक सहभागी होतात, याचा मला अभिमान आहे.’ चंद्रपूरचा नागरिक म्हणून देशासाठी आपण या जिल्ह्याचे योगदान देऊ शकलो, याचा अभिमान असल्याचेही ना. मुनगंटीवार म्हणाले.‘भारत-पाकिस्तानच्या सीमेवर छत्रपती शिवाजी महाराजांचा पाकिस्तानच्या दिशेने तलवार घेऊन उभा असलेल्या पुतळ्याचे अनावरण करण्याचे भाग्य मला लाभले. त्या क्षणाला माझे उर अभिमानाने भरून आला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघनखांसाठी लंडनमध्ये जाऊन करार केला तेव्हा चंद्रपूरचा आवाज जगात गौरवाने पोहोचविल्याचा अभिमान वाटला. आता २२ जानेवारीला देशगौरव, युगपुरुष पंतप्रधान नरेंद्रजी मोदी अयोध्येतील प्रभू रामाच्या मंदिराची पुजा करतील तेव्हा त्या मंदिराच्या प्रत्येक दाराचे लाकूड चंद्रपूरचे असेल, याचा प्रत्येक चंद्रपूरकराला अभिमान वाटेल. एवढेच नव्हे तर लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसद भवनात प्रवेश करताना देशातील प्रत्येक खासदाराला चंद्रपूरच्या लाकडाने तयार झालेल्या मंदिरातून जावे लागेल, ही बाब देखील तेवढीच अभिमानाची आहे,’ असेही ना.मुनगंटीवार म्हणाले.

# सामान्यातून असामान्यांची निर्मिती करते संस्कार भारती -विवेक कवठेकर



**पुलगाव I प्रतिनिधी**

संस्कार भारती अनेक विधांच्या माध्यमातून विविध कला क्षेत्रातील उत्सुकांना मंच उपलब्ध करून देते. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांच्या कला गुणांना विकसित करते. त्यामुळे सामान्यातून असामान्य कलाकारांची निर्मिती होते. कलाक्षेत्रातील अनेक दिग्गज संस्कार भारतीच्या प्रवाहात आहेत किंवा प्रवाहातून गेले आहे.भारतीय संस्कार रुजविणे व वृद्धिंगत करण्याचे कार्य संस्कार भारतीच्या माध्यमातून अविरत सुरु आहे . असे प्रतिपादन संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत मंत्री विवेक कवठेकर यांनी केले.

संस्कार भारती पुलगावच्या दीपावली स्नेहमिलन व रांगोळी स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.संस्कार भारती च्या प्रमुख असलेल्या उत्सवा पैकी एक असलेला दीपावली स्नेहमिलन उत्सव पुलगाव शाखेच्या वतीने स्थानिय साईबाबा मंगल कार्यालयात २७ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमा अंतर्गत दिवाळी निमित्याने घेतलेल्या रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाला संस्कार भारतीचे विदर्भप्रांत मंत्री विवेक कवठेकर, वर्धा जिल्हामंत्री मकरंद उमाळकर, तालुका संघचालक विजयराव निवल, यवतमाळ जिल्हा कार्यकारिणी सदस्य अनंत कौलगीकर प्रामुख्याने उपस्थिती होते तर अध्यक्षस्थानी हेडगेवार अकृषक ग्रामीण नागरी सह. पतसंस्थेचे अध्यक्ष जयंत ओक व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते रंगदेवता नटराज, भारतमाता पूजन व दिपप्रज्वलन करून उदघाटन झालेल्या या दीपोत्सव कार्यक्रमात दिवाळी निमित्याने आयोजित रांगोळी स्पर्धेत विजयी स्पर्धकांना डॉ. हेडगेवार ग्रामीण अकृषक नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रथम क्रमांक कु. श्रेणी संजय खंदारे यांनी रेखाटलेल्या मातालक्ष्मी रांगोळीला, द्वितीय कु. श्रेया सावळकर यांच्या श्रीरामाच्या स्मितवदन रांगोळीला, तृतीय स्नेहा पवार यांच्या संस्कार भारती रांगोळीला प्राप्त झाला. सोबतच कांचन राऊत, विद्या जाधव, तृषाली लेकुरवाळे, कीर्ती चिचाटे, आचल पागोटे यांच्या रांगोळ्यांना प्रोत्साहन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.मनोरंजनात्मक कार्यक्रमात स्थानिक संस्कार भारती संगीत विधा सदस्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यात सुनील कुडे, मनीषा लोखंडे, कु. कृष्णप्रिया घोटेकर, कु. दिशा वर्मा, कु. नारायणी चचाने, आवैक उभाड यांच्या सुमधुर गायनाला हार्मोनियम वादक अंकुश उभाड व परटक्के गुरुजींनी तर तबला वादक आकाश निनावे यांनी साथसंगत केली.दीपोत्सव कार्यक्रमाकरिता विजयी स्पर्धकांच्या सहभागीतेतून रेखाटलेल्या दीपोत्सव रांगोळीची विशेष प्रसंशा करीत संस्कार भारती हे संस्कृती जतन व संस्कारांची कार्यशाळा असल्याबाबतचे मत प्रांतमंत्री विवेकजी कवठेकर यांनी आपल्या उदबोद्धनातून व्यक्त केले.सुबोध चचाने यांनी प्रास्ताविक केलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर पेरके, ध्येयगीत नारायणी चचाने तर आभार प्रदर्शन हितेंद्र पैकीने यांनी केले. आयोजनाकरिता प्रामुख्याने राजेश टिपसे, अविनाश भोपे, मनस्वी भोयर, सुभाष जगताप, पल्लवी पेरके, सिमा चचाने, वर्षा बाभळे, सुचिता बैतूले तथा सर्व संस्कार भारती सदस्यांनी सहकार्य केले.

# वरोरा-चिमूर रस्त्याचे काम पूर्ण करून विकासाची साडेसाती दूर करा

### आमदार प्रतिभाताई धानोरकर यांची केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

**वरोरा I प्रतिनिधी**



जिल्ह्यात राज्य व राष्ट्रीय महामार्गाचे जाळे निर्माण करून विकासाच्या मुख्य प्रवाहात चंद्रपूर जिल्हा यावा असे स्वप्न होते. मात्र, याच विकासाला मागील साडेसहा वर्षांपासून साडेसाती लागली आहे. वरोरा - चिमूर रस्ता अर्धवट असल्यामुळे या मार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले असून विकासाला ब्रेक लागला आहे. त्यामुळे तात्काळ या मार्गाचे काम पूर्ण करण्याकरिता स्वतः केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लक्ष देऊन हा प्रश्न पूर्ण करण्याची विनंती आमदार प्रतिभा धानोरकर यांनी पत्राद्वारे केली आहे. वरोरा - चिमूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३ ए मध्ये ४२.७५ किमीच्या २८४ करोड रुपयांच्या विकास कामाला दि. ४ मार्च २०१७ ला सुरवात झाली. हे काम ३ मार्च २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते.त्यानंतर सुधारित वाढीव मुदत देऊन ३० जून २०२३ करण्यात आली. सद्यस्थितीत संबंधित विभागाकडे चौकशी केली असता हे काम ९० टक्के पूर्णत्वास असून येत्या ३१ जानेवारी २०२४ पर्यंत पूर्ण होईल अशी माहिती दिली. मात्र अजूनही ४-५ किमी चार पदरी रोडचे काम बाकी असून रोड साईड ड्रेनेज १ किमी, १ पाईप कल्व्हर्ट, २ मायनर ब्रिजेस, ८ निवारा शेड व पार्किंग, ४.५ किमी स्ट्रीटलाईट व हायमास्ट बाकी असून गत २-३ महिन्यात लहान मोठ्या अपघातात अनेकांनी जीव गमावले तर काहींना कायम अपंगत्व आले. या जीवघेण्या अपूर्ण कामास त्वरित पूर्णत्वास न नेल्यास ग्रामस्थांना घेऊन रस्त्यावर उतरून आंदोलनाचा इशारा देखील आमदार प्रतिभा धानोरकर यांनी दिला आहे.

# अवकाळी पावसाने झालेले नुकसान गांभीर्याने घ्या

## तातडीची बैठक घेऊन दिले खा.सुनिल मेंढे यांनी सर्वेक्षणाचे निर्देश

**भंडारा I प्रतिनिधी**

दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे ताबडतोब सर्वेक्षण करून अहवाल तयार करावा अशा स्पष्ट सूचना खासदार सुनील मेंढे यांनी २८ नोव्हेंबर ला जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत दिल्या.सुरू असलेला अवकाळी पाऊस आणि अन्य महत्त्वाच्या विषयांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात खासदारांनी बैठकीचे आयोजन केले होते. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासह अन्य विभागांचे प्रमुख या बैठकीला उपस्थित होते. २७ आणि २८ या दोन दिवसात जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाला. ढगाळ वातावरणामुळे शेतातील पीक खराब होण्याच्या मार्गावर आहे. उभे असलेले आणि कापून ठेवलेले धान तसेच कळपा पावसात भिजल्याने नुकसान होण्याची शक्यता अधिक आहे. त्याचे ताबडतोब पंचनामे करावेत आणि शासनाला अहवाल पाठवावा असे निर्देश खासदारांनी यावेळी दिले. रोगाचा प्रादुर्भाव होऊन धान पिकाचे



नुकसान झाले होते. त्याचे सर्वेक्षण होऊन जवळपास १०८२० हेक्टर मध्ये नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यासाठी १६ कोटी ८० लाख रुपयांच्या निधीची मागणी प्रशासनाने केली असून हा अहवाल विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आला आहे. ही मदत मिळण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न करावेत असे खासदारांनी यावेळी सांगितले. पावसाने झालेले जे नुकसान पिक विमात बसत नसेल तर अन्य पद्धतीने नुकसानग्रस्तांना मिळावे यासाठी नियोजन करण्याच्या सूचना यावेळी करण्यात आल्या.कारधा ते निलज या मार्गाचे काम १२ ते १३ किलोमीटर एवढे शिल्लक आहे. ते तातडीने पूर्ण करावे अशा सूचना यावेळी खासदारांनी केल्या. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेच्या विषयी आलेली अडचण दूर करण्याच्या दृष्टीने चर्चा करून तोडगा काढण्याचे निर्देश दिले गेले. नेरला उपसा सिंचन योजनेचे पाणी उन्हाळ्यात शेतकऱ्यांना मिळेल की नाही असा संभ्रम शेतकऱ्यांमध्ये होता, त्यावरही कार्यकारी अभियंता सोबत चर्चा करून तो दूर करण्यात आला. हेमलकसा प्रकल्पातील झाडे कापण्याचा विषय या बैठकीत चर्चेला आला. या अनुषंगाने प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला असून तोही मार्गी लागेल असे सांगण्यात आले.इतरही अनेक विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. धान पिकाच्या नुकसानी संदर्भात प्रशासनाने गांभीर्याने हालचाली कराव्यात असे निर्देश त्यांनी पुन्हा एकदा अधिकाऱ्यांना दिले.

# विकसीत भारत संकल्प यात्रे’च्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत पोहचा-सहसचिव आनंद पाटील

**चंद्रपूर I प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात २३ नोव्हेंबर २०२३ पासून ‘विकसीत भारत संकल्प यात्रेचा’ शुभारंभ करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ८२५ ग्रामपंचायतीमध्ये सदर यात्रेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. ज्यांना आतापर्यंत शासकीय योजनांचा लाभ मिळाला नाही, अशा लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्याच्या उद्देशाने प्रत्येक यंत्रणेने यात गांभिर्याने काम करावे, अशा सुचना केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाचे सहसचिव तथा विकसित भारत संकल्प यात्रेचे चंद्रपूर जिल्ह्याचे नोडल अधिकारी आनंद पाटील यांनी दिल्या. तत्पुर्वी विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान त्यांनी तीन गावांना भेटी दिल्या व गावकऱ्यांशी संवाद साधलाजिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपायुक्त चंदन पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) मिना साळूंके यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.या




यात्रेच्या माध्यमातून विविध विभागांनी स्वत:हून लाभार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे, असे सांगून सहसचिव आनंद पाटील म्हणाले, आपल्यापर्यंत लाभार्थी येण्याची वाट पाहू नका. जिल्ह्यात ज्या ठिकाणी या यात्रेचा चित्ररथ जाईल, तेथे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्यात. प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर योजनेचा लाभ मिळालेल्या किमान तीन लाभार्थ्यांचे मनोगत घ्यावे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा यात समावेश करावा तसेच योजनेचे व्हीडीओ क्लिप करून ते यात्रेदरम्यान दाखवावे. यात्रा सुरू होण्यापूर्वी जिल्ह्यात किती लाभार्थी होते, आणि उपक्रम झाल्यानंतर किती लाभार्थ्यांना लाभ दिला, त्याचीही आकडेवारी आतापासून गोळा करा.पुढे ते म्हणाले, केंद्र सरकारकडून विकसीत भारत संकल्प यात्रा हा महत्वाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरी आणि ग्रामीण भागात १७ महत्वाच्या योजनांची माहिती या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविण्यात येत आहे. ज्यांना आतापर्यंत कोणत्याच योजनांचा लाभ मिळाला नाही, अशा नागरिकांपर्यंत पोहचण्याचा हा प्रयत्न आहे. सदर योजनेत काय - काय लाभ मिळू शकतात, कोण लाभार्थी होऊ शकतात, यासदंर्भात एकत्रित माहिती देण्यात येत असून केंद्र सरकारतर्फे प्रत्येक जिल्ह्यात ७ ते १० चित्ररथ पाठविण्यात आले आहे. जिल्ह्यात पी.एम. विश्वकर्मा योजनेचे उद्दिष्ट ठरवावे. गावस्तरावरील लोकांना बँकांच्या विविध योजनांची माहिती तसेच बँकेच्या व्यवहाराबाबत माहिती द्यावी, असेही पाटील यांनी सांगितले.यावेळी सादरीकरणात जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, जिल्ह्यात ८२५ ग्रामपंचायती असून १८३६ गावे आहेत. विकसीत भारत संकल्प यात्रेच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकारी स्तरावर त्याचा नियमित आढावा घेण्यात येत असल्याचे विनय गौडा यांनी सांगितले.

**सहसचिवांच्या तीन गावांना भेटी :**

**विकसीत भारत संकल्प यात्रेचे नियोजन, गावागावात होणारी अंमलबजावणी पाहण्यासाठी सहसचिव आनंद पाटील यांनी टेमुर्डा (ता. वरोरा), नंदोरी (ता. भद्रावती) आणि सोनेगाव (ता. चंद्रपूर) या तीन गावांना भेटी देऊन गावकऱ्यांशी वाद साधला.**

**यात्रेत समाविष्ट असलेल्या योजना :**

**पी.एम. स्वनिधी योजना, पी.एम. विश्वकर्मा, पी.एम. उज्वला, पी.एम. मुद्रा लोन, स्टार्टअप इंडिया - स्टँड अप इंडिया, आयुष्मान भारत, पी.एम. आवास (शहरी), स्वच्छ भारत अभियान (शहरी), पी.एम. ई-बस सेवा, अमृत योजना, पी.एम.जनऔषधी योजना, उजाला योजना, सौभाग्य योजना, डिजीटल पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चर योजना, खेलो इंडिया, आर.सी.एस. उडाण आणि वंदे भारत ट्रेन्स व अमृत भारत स्टेशन स्कीम.**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .